# रे.दि.मु.नं. १७३/२०२४ मधील नि. ५ वरिल आदेश

(CNR NO- MHST-07001229-2024)

**शकुंतला शिवाजीराव माने वि. सुधाकर दत्ताजीराव माने**

वादीने सदरचा दावा हा जाहीर ठरावाकरिता तसेच निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील दावा कलम १अ मधील विहीर मिळकत ब हा या ताकीद अर्जाचा वाद विषय आहे.

०२. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी यांचे मुळपुरुष कै.लक्ष्मण आबाजी माने हे होते. दावा मिळकत मुळची वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार कै.लक्ष्मण आबाजी माने यांचे मालकी, हक्क, वहिवाटीची होती. कै.लक्ष्मण हे दि. १८/०१/१९६५ रोजी मयत झाले. त्यांचे पश्चात दावा मिळकतीचे रेकॉर्ड सदरी वारस म्हणून कै.दत्ताजीराव माने ए.कु.मॅ म्हणून वारस रजिस्टर नं. ४९१ नुसार फेरफार नं. ५९२६ ने नोंद झाली. दावा मिळकतीत एकत्र कुटूंब असतांना दावा मिळकतीत एकत्रात व समाईकात वहिवाट असतांना सन १९६८–६९ चे सुमारास ०हे. ०३ आर क्षेत्रात विहीर काढलेली होती. सदर मिळकतीचे रेकॉर्डसदरी कै. दत्ताजीराव लक्ष्मण माने ए.कु.मॅ म्हणून नोंद असल्याने विहीरीमध्ये ५ एच.पी मोटार पाण्याचे उपसाकरिता बसविली होती. सदर विहीरीवर विद्युत कनेक्शन कै.दत्ताजीराव माने यांचे नावे घेतलेले आहे. तेंव्हापासून विहीरीचेपाणी समाईकात एकत्र कुटूंबासाठी वापर करीत होते.

०३. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी यांना मौजे खालकरवाडी व चरेगांव येथे वडिलार्जित मिळकती होत्या व त्यांच्यात कौटूंबिक व्यवस्थेप्रमाणे व वाटपाप्रमाणे दावा मिळकतीचे व इतर मिळकतींचे तोंडी वाटप झाले होते. त्याप्रमाणे दावा कलम १अ या मिळकतीस कै.दत्ताजीराव, कै.शंकरराव, कै.बाळकृष्ण यांची प्रत्येकी समान हिश्याने सन १९७५ साली फेरफार नं. ५४ नुसार

५आणे ४पै हिश्याने नोंदी झालेल्या होत्या. त्याप्रमाणे दावा मिळकतीचे वहिवाट ही स्वतंत्रपणे सुरु होती व मिळकतीत पाण्याचे सोईकरिता पुर्वापार विहीर होती. सदर विहीरीचे पाणी कै.लक्ष्मण माने यांचे वारस कै.दत्ताजीराव, कै.शंकरराव, कै.बाळकृष्ण हे प्रत्येकी १/३ हिश्याने म्हणजेच प्रत्येकी आठ दिवसाप्रमाणे विहीरीचे पाण्याचे पाळीप्रमाणे पाणी पिकासाठी घेत होते. त्याप्रमाणे पुर्वापारपासून प्रत्येकी समान हिश्याने म्हणजेच वादी नं. १ ते ३ यांची आठ दिवसाची पाणी पाळी, वादी नं. ४ व ५ यांची आठ दिवसांची पाणी पाळी, व प्रतिवादी यांची आठ दिवसांची पाणी पाळी पिकांसाठी घेत होते. तसेच विहीरीचे दुरुस्ती, पाईपलाईन, लिकेज, वगैरे बाबतचा खर्च वादी व प्रतिवादी हे समान हिश्याने करत आलेले होते. सदर गटातील विहीरीचा पाण्याचा वापर हा फक्त दावा कलम १अ या मिळकतीचे वापराकरिता वादी व प्रतिवादी करत आलेले आहेत. त्याबाबत त्यांच्यामध्ये कधीही तक्रार नव्हती. वादी व प्रतिवादी हे विहीरीतील पाण्याचा उपभोग करुन उस, भुईमुंग, सोयाबीन वगैरे पिके घेतलेली होती व आहेत. दावा मिळतीत सध्या वादी व प्रतिवादी यांचे उसाचे पिक आहे.

०४. वादीने पुढे असे कथन केले की, प्रतिवादी यांना काही इसमांनी फुस लावल्याने त्यांनी वादी यास समाईकातील विहीरीतील पाणी उपसा करु नका, तुमचा विहीरीमध्ये काही हक्क नाही अशी दि. ११/०३/२०२४ रोजी धमकी दिलेली आहे. तेंव्हापासून प्रतिवादी हे वादीस विहीरीतील पाणी पाळीप्रमाणे घेण्यास हरकत करु लागले आहेत. प्रतिवादीच्या कृत्यामुळे वादीच्या उसाचे पिकाचे पाण्याअभावी फार मोठे नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादी यांनी पाळीप्रमाणे पाणी घेण्याचा हक्क डावलल्याने वादीचे पिकाचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीस वादी यांचा २/३ हिश्याप्रमाणे म्हणजेच वादी नं. १ ते ३ यांची आठ दिवसाची पाणी पाळी व वादी नं. ४ व ५ यांची आठ दिवसांची पाणी पाळीप्रमाणे पाणी उपसा करण्यास प्रतिवादी यांनी मज्ञाव

व हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद मिळण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०५. प्रतिवादींनी वादीचे नि. ५ चे अर्जास नि.क्र. १५ वर म्हणणे व कैफियत दाखल केली असून, वादीचा नि.क्र. ५ मधील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असून, तो प्रतिवादीस मुळीच मान्य व कबूल नसल्याचे कथन केले आहे.

०६. प्रतिवादीचे म्हणणे असे आहे की, वादी व प्रतिवादी यांचे कुटूंबाकडे गट नं. १४७अ खेरीज गट नं. १४७ब, गट नं. ११५, गट नं. १२४, गट नं. १४९ व गट नं. १५७ अशा खालकरवाडी येथे शेतजमिनी आहेत. त्याची कब्जेवविहाट, पाणी व्यवस्था याचा योग्य तपशील देणे मुद्दाम टाळले आहे. उदा. गट नं. १२४ मध्ये दोन विहीरी असून त्यातील विहीर वादी नं. १ ते ३ हे वापरत असून दुसरी विहीर वादी नं. ४ व ५ हे वापरत आहेत, हा तपशील मुद्दाम व जाणीवपूर्वक नमूद करणे टाळला आहे. याशिवाय वादी नं. १ ते ५ हे सर्वजण खालकरवाडी येथेच रहाणारे आहेत. तसेच वादी नं. १ हे वयोवृध्द असलेचे मोघम विधान करुन त्यांचे सर्वातर्फे अमर प्रकाश माने म्हणजेच वादी नं. ५ चे चिरंजीव यांना मुखत्यारपत्र दिलेले आहे. सदर मुखत्यारपत्रातील कलम ३ ते ६ मधील मजकूर चुकीचा व गैरलागू असून रितसर नोंदणीकृत मुखत्यारपत्र करणे आवश्यक होते. सदर मुखत्यारपत्र उंब्रज येथे दि. १२/०३/२०२४ रोजी टंकलिखीत करुन दिले आहे. मात्र स्टॅम्पची खरेदी वादी नं. ५ यांचे नावे दि. ३०/०६/२०२३ रोजी केल्याचे दिसून येते. मात्र तो स्टॅम्प नियमानुसार सहा महिन्यात वापरणेचे बंधन असतांना प्रत्यक्षात दि. १२/०३/२०२४ रोजी कुलमुखत्यारपत्र लिहून दिले. यावरुन तांत्रीकदृष्टया देखील कुलमुखत्यारपत्रावरुन केलेला दावा देखील रद्दबातल होण्यास पात्र आहे.

०७. प्रतिवादीचे पुढील कथन असे की, दावा मिळकत शेतजमिन गट नं. १४७अ यामधील विहीरीमध्ये वादीचा हक्क व कब्जा कधीही नव्हता. वादीस कोणत्या ही हक्काने पाळीप्रमाणे पाणी घेण्याचा हक्क नव्हता. सदर विहीरीवर विद्यूत मोटर व पाईपलाईन या प्रतिवादीने स्वतःचे खर्चाने केलेली आहे व त्याचा वापरही प्रतिवादी एकटाच करत आहे. तसेच वीजेचे बिल देखील प्रतिवादी हे एकटेच भरत आहेत. त्यामध्ये वादीचा कोणताही हक्क नाही. सदर मिळकतीस उमेश्वर सहकारी पाणीपुरवठा संस्था यांची नदीवरील स्कीमवरुन पाणी मिळण्याची सोय आहे. मात्र प्रतिवादी यांचे हिश्यास त्यांनी कधीही स्कीमचे पाणी घेतलेले नाही. विहीरीचे पाण्यावर उसाचे बागयती पिक घेवून उस सहयाद्री साखर कारखान्याला दिलेला आहे. दोन्ही वादी कुटूंबाच्या स्वतंत्र विहीरी असून स्वतःचे विहीरीतून व नदी पाणी पुरवठा योजनेतून सदर वादी पाणी वापरत असतात. मात्र प्रतिवादीसाठी दावा मिळकतीमधील विहीर ही त्याचे क्षेत्राला पाणी मिळण्याचे एकमेव साधन आहे. सबब वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

०८. वादी व प्रतिवादी यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचा दाव्यामधील पुरावा व युक्तीवाद लक्षात घेता खाली निर्णयार्थ मुद्दे निष्कर्षासह घेतले आहेत.

| अनु.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शीनी प्रकरण त्याच्या बाजूने आहे हे सिद्ध केले आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | न्यायाची तौलनिक बाजू वादीच्या हक्कात आहे काय ? | होकारार्थी. |
| ३. | तात्पुरता मनाई हुकूम अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

०९. प्रस्तुत प्रकरणात वादीने नि. ३ लगत मौजे खालकरवाडी येथील भुमापन क्र.१४३/अ, सव्र्हे नं. ४८/२, भुमापन क्र. १४१/अ इत्यांदीचे ७/१२ उतारे, तसेच फेरफार क्र. ५९२६, ५४ उतारे व विहीरीचे विद्यूत बिल इत्यांदी दस्तऐवज दाखल केलेले आहेत. तसेच वादीने नि. १९ लगत गट नं. १४७अ या शेतीस सहकारी पाणी पुरवठा संस्थेचा पाणी नसलेचा दाखला, मौजे खालकरवाडी येथील फरफार नं. ५२२, १०३५, ३९५, ५९७, २०१ इत्यांदीचे उतारे व गट नं. १४७, १४९ चा नकाशा, मिळकतीचे फोटो इत्यांदी दस्तऐवज दाखल केलेले आहेत.

१०. याउलट प्रतिवादीने नि. २२ लगत प्रतिवादी यांनी सहयाद्री कारखान्यास उस घातल्याच्या बिल पावती, प्रतिवादीने भलरेले लाईट बिल, नवीन मोटारची बिल, उंब्रज पो.स्टेशन येथे दिलेली एन.सी.आर नं. १०८७/२०१८ ची प्रत, गट नं. १२४ चा उतारा, वादीचे उसपिकास पाणी जात असल्याचे फोटो, तसेच वादी यांचे विहीरीची लाईट बिलाच्या प्रती इत्यांदी दस्तऐवज दाखल केलेले आहेत.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करिता :–</u>**

११. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेंकांशी सलग्न असल्यामुळे, ते एकत्रित विवेंचनाकरिता विचारात घेण्यात आलेले आहेत.

१२. प्रस्तुतच्या प्रकरणात वादी व प्रतिवादी यांच्या अर्जाचे अवलोकन करुन दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादी यांनी दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने सदर अर्जामध्ये अशी कथने की, वादी व प्रतिवादी

हे दोन्हीही मुळ पूर्वज लक्ष्मण आबाजी माने यांचे वारस आहेत. लक्ष्मण माने यांच्या पश्चात दत्ताजीराव माने, शंकरराव माने व बाळकृष्ण माने असे लक्ष्मणराव यांना तीन मुले होती. लक्ष्मणराव यांच्या पश्चात दत्ताजीराव हे एकत्र कुटूंबाचे कर्ता या नात्याने सर्व व्यवहार पाहत होते. त्यामुळे दत्ताजी माने यांचे नाव ७/१२ रेकॉर्डसदरी ए.कु.मॅ म्हणून लावलेले होते व त्यांच्या काळापासूनच तिन्ही भाऊ एकत्रीतरित्या वहिवाट करत होते. सन १९७५ मध्ये कौटूंबिक व्यवस्थेप्रमाणे दत्ताजीराव, शंकरराव व बाळकृष्ण यांच्यामध्ये तोंडी वाटप होवून त्यांना प्रत्येकी समान हिस्सा मिळाला व त्याप्रमाणे फेरफार क्र. ५४ नोंदविण्यात आला. दत्ताजीराव, शंकरराव व बाळकृष्ण यांच्या हिश्याला मिळालेल्या जमिनीला पाण्याच्या सोईकरिता पुर्वापार विहीर होती व आहे. त्याप्रमाणेच प्रत्येकी १/३ हिश्याने म्हणजेच प्रत्येकी ८ दिवसाच्या विहीरीच्या पाण्याच्या पाळीप्रमाणे पिकासाठी पाणी देत होते व आहेत.

१३. वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, लक्ष्मण आबाजी माने हे दि. १८/०१/१९६५ रोजी मयत झाले असून त्याप्रमाणे फेरफार नं. ६९२६ नोंदविण्यात आला व दत्ताजीराव लक्ष्मण माने यांची नोंद ए.कु.मॅ म्हणून त्यांची रेकॉर्डसदरी नोंद करण्यात आली असून तेंव्हापासून त्यांना मिळत असलेले सर्व लाभ दत्ताजीराव, शंकरराव व बाळकृष्ण यांना एकत्रात मिळत आहेत. तसेच आजमितीला देखील मयत दत्ताजीराव लक्ष्मण माने यांच्याच नावाचे वादातिथ विहीरीवर मोटरचे विद्यूत कनेक्शन घेतलेले आहे. वादीचे पूर्वीपासूनच विहीरीचा पाणी घेण्याचा कस्टमरी हक्क असल्यामुळे वादी हे सदर विहीरीवरती ८ दिवसाच्या पाळीने पाणी घेत होते, परंतू हल्ली प्रतिवादींनी वादीस पाणी घेण्यासाठी मज्जाव केला आहे. वादींच्या वर्षानुवर्षे चालत आलेल्या कस्टमरी हक्कास प्रतिवादी विरोध करत असल्यामुळे वादीचा सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

१४. प्रतिवादीने नि. २७ वर लेखी युक्तीवाद देवून कथन केले की, ज्या विहीरीच्या पाण्याबाबत वादी हक्क मागत आहेत त्याबाबतचा कोणताही तपशील वादीच्या दाव्यामध्ये नमूद केलेला नाही. तसेच दत्ताजीराव यांच्या वंशामध्ये प्रतिवादी सुधाकर, पद्मीणी, मयत रंजना व दमयंती यांच्या नावाचा समावेश आहे. गट नं. १४७अ च्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता त्यामध्ये देखील मयत रंजना वगळता इतर सर्वांची नावे भोगवटदारसदरी नमूद आहेत. राजेंद्र दत्ताजी माने यांनी गट नं. १४७अ ही मिळकत तारण ठेवून लाखो रुपयांचे कर्ज घेतलेले आहे. तसेच सदर विहीर एकत्र कुटूंबात काढली असल्याबाबतचा वादीकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. फेरफार क्र. ५४ हा आणेवारीचा असून वाटपाबाबतचा नाही. वादीने ज्या तथाकथित पाण्याच्या पाळीबाबत दावा दाखल केला आहे त्याबाबत देखील कोणताही तपशील उदा. पहिल्यांदा पाणी कोण घेत होते, दुसरा नंबर कोणाचा, तिसरा कोण तसेच कोणत्या तारखेपासून अथवा वारा पासून सदरचे नंबर, पाळी, सुरु होईल हे देखील नमूद नाही. यावरुन देखील विहीरीचे पाणी कधीही सामाईकात घेतले जात नव्हते हे स्पष्ट होते. उलटपक्षी वादी यांनी दि. ३०/०४/२०२४ रोजी दाखल केलेल्या कागदपत्राच्या यादीमध्ये प्रतिवादी यांनी मोटारीचे भरलेले बिल तसेच नवीन मोटार बसविल्याची खर्चाचा तपशीलवार बिल दाखल केलेले आहे. यावरुन देखील केवळ प्रतिवादी मिळकत वहिवाटतात असे स्पष्ट होते. त्यामुळे वादी सदर विहीरीतून १/३ हिश्याने पाणी घेत होते हे कुठेही सिध्द् होत नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी विंनती केली.

१५. वादीने आपल्या कथनाच्या पृष्ठयर्थ नि. ३ लगत वादमिळकतीचे ७/१२ उतारा, फेरफार नं. ५४, फेरफार क्र. ५९२६, मौजे खालकरवाडी येथील भुमापन क्र. १४७अ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर उता–यांचे अवलोकन केल्यास

असे दिसून येते की, प्रकाश बाळकृष्ण माने यांच्या नावासमोर खातेक्रमांक ५८८ असा दर्शविला आहे. तसेच दिलीप बाळकृष्ण माने यांच्या नावासमोर खातेक्रमांक ८४२ असा दर्शविला आहे. खाते क्र. १४७अ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, खाते क्र. ५८८ व ८४२ या दोन्ही खात्यामध्ये जलसिंचनाचे साधन म्हणून विहीर दर्शविलेली आहे. वादीने दाखल केलेल्या नि. ३ लगत २ वरील ७/१२ उतारा व खातेउतारा व फेरफार नं. ६९२६ चे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, लक्ष्मण आबाजी माने यांच्या मृत्यूनंतर दत्ताजीराव लक्ष्मण माने यांची ए.कु.मॅ. म्हणून रेकॉर्डसदरी नोंद झाली आहे व त्यांना सिंचनाकरिता विहीरीच्या पाण्याचा उपयोग करत असल्याच्या ७/१२ रेकॉर्डसदरी नोंद झालेल्या दिसून येतात. सदरच्या नोंदी या सन १९७०–७१ सालापासून ७/१२ रेकॉर्डसदरी दत्ताजी लक्ष्मण माने वगैरे ३ अशी रेकॉर्डसदरी नोंद असून त्यांच्या शेतीला सिंचनाचे साधन म्हणजे विहीर दाखविलेली आहे. त्यामुळे वादी हे फार पूर्वीपासून शेतमिळकतीस विहीरीच्या पाण्याचा उपयोग करतात असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे आजमितीला वादीने केलेली कथने ही अविश्वासार्ह वाटण्यास कोणतेही संयुक्तीक कारण दिसून येत नाही. त्यामुळे वादीने प्रकरण सकृतदर्शीनी त्याच्या बाजूने असल्याचे सिद्ध केले आहे व मनाई हुकूमाचा आदेश वादीस मिळाला नाही तर वादीच्या शेतीचे तसेच शेतातील पिकांचे नुकसान होणार आहे. उलटपक्षी मनाई हुकूमाचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचा कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. कारण प्रतिवादी देखील वादातिथ विहीरीवरुन शेतीकरिता पाणी घेत आहेत. न्यायाची तौलनिक बाजू सुद्धा वादीच्याच हक्कात आहे. सबब मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र. ४ चे उत्तर खालील आदेशान्वये देण्यात येते.

## <u>आदेश</u>

१. तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी स्वतः अगर इतरांमार्फत दावा कलम १ब मधील सामाईक विहीरीतील वादी नं. १ ते ३ यांची आठ दिवसांची पाणी पाळी, तसेच वादी नं. ४ व ५ यांची आठ दिवसांची पाणी पाळीप्रमाणे पाणी उपसा करण्यास मज्जाव व हरकत अडथळा करु नये अशी दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत, तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते.

३. अर्जाचा खर्च ज्याचा त्यांनी सोसावयाचा आहे.

SAYED AASMA ZAINODDIN

Digitally signed by SAYED AASMA ZAINODDIN
Date: 2025.03.07 15:06:09 +0530

(डॉ. ए. झेड. सय्यद)

दि. ०७/०३/२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, कराड